सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५/½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३९१५
माझगांव कार्यालय :विक्रीकर भवन, ९ वा माळा, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग, माझगांव,मुंबई ४००२०३ दूरध्वनी : २३७४२१९१ फॅक्स : २३७८१०६१

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

## राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२०१५

**जाहिरात क्रमांक : २१६/२०१४** **क्रमांक १४७७(१)/२०१५/तीन**

खालील तक्त्यामधील पदावरील भरतीकरीता **राज्य सेवा (पूर्व) परीक्षा - २०१५, रविवार, दिनांक ५ एप्रिल, २०१५** रोजी महाराष्ट्रातील **३६ जिल्हाकेंद्रावर** घेण्यात येईल.

२. प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटींची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून **ऑनलाईन** पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**३. अर्जामध्ये चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी व या पुढील सर्व निवडीसाठी आयोग अपात्र ठरवू शकेल.**

**४. उपलब्ध पदसंख्या :-**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व | शै.व सा. मा. प्रवर्ग | विमाप्र-अ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १ | उप जिल्हाधिकारी, गट-अ (एकूण ९ पदे) | -- | ३▼ | ३▼ | १▼ | १▼ | १▼ | -- | -- | -- | -- | -- |
| २ | पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट-अ (एकूण १३ पदे) | -- | २ | ३ | १ | -- | -- | १ | -- | ६ | -- | -- |
| | महिला - | -- | १* | १* | -- | -- | -- | -- | -- | २* | -- | -- |
| ३ | सहायक विक्रीकर आयुक्त, गट-अ (एकूण ३ पदे) | १ | -- | १ | १▼ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ४ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी /गट विकास अधिकारी, गट-अ (एकूण २१ पदे) | ४ | १+४▼ | १+२▼ | १▼ | १▼ | १+२▼ | -- | -- | १+२▼ | १▼ | -- |
| | महिला - | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ५ | सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (एकूण १५ पदे) | ५ | ३ | २ | १ | -- | १ | -- | -- | २ | १ | -- |
| | महिला - | ४ | ३ | १ | १ | -- | १ | -- | -- | १ | -- | -- |
| | खेळाडू - | १☑ | -- | १☑ | -- | -- | -- | -- | -- | १☑ | -- | -- |
| ६ | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट अ (एकूण १ पद) | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ७ | तहसिलदार, गट-अ (एकूण १० पदे) | ४ | १▼ | -- | १▼ | -- | १▼ | १▼ | १▼ | -- | १▼ | -- |
| | महिला - | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | खेळाडू - | १☑ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ८ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी,गट-ब (एकूण १३ पदे) | ८ | १ | १ | १ | १ | -- | -- | -- | -- | १ | -- |
| ९ | कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण ३६+२# = ३८ पदे) | १७+२# | ४+१▼ | २+१▼ | -- | -- | २ | -- | १ | ३ | ४ | १ |
| | महिला - | ५* | १* | १* | -- | -- | १* | -- | -- | १* | १* | -- |
| | खेळाडू - | १☑ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १० | सहायक गट विकास अधिकारी, गट-ब (एकूण ९ पदे) | ३ | १ | -- | -- | १ | -- | -- | -- | ४ | -- | -- |
| | महिला - | १* | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १* | -- | -- |
| ११ | मुख्याधिकारी, गट-ब (एकूण ३५ पदे) | १७ | -- | १ | २ | -- | २ | -- | २ | ७ | ३ | १ |
| | महिला - | ५* | -- | -- | १* | -- | १* | -- | १* | २* | १* | -- |
| | खेळाडू - | २☑ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | @ अंध / अल्पदृष्टी - १, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदुचा अर्धांगवायु - १ | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १२ | **उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गट ब (एकूण ८ पदे)** | ३ | १ | २ | -- | -- | १ | -- | १ | -- | -- | -- |
| १३ | **उप अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण ३ पदे)** | २ | १▼ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १४ | **सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट- ब (एकूण १ पद)** | -- | -- | १▼ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| १५ | **नायब तहसिलदार, गट-ब (एकूण ३७ पदे)** | २० | २ | -- | ४ | १ | -- | -- | १ | ४ | ४ | १ |
| | महिला - | ६* | १* | -- | १* | -- | -- | -- | -- | २* | १* | -- |
| | खेळाडू - | १☑ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १☑ | -- | -- |

**टीप** :- ▼ अशी खूण केलेली पदे अनुशेषाची आहेत. * महिलांसाठी आरक्षित ☑ खेळाडूंकरिता आरक्षित @ विकलांग व्यक्तींकरिता आरक्षित. # महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील पदे

२.१ वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये / आरक्षण प्रवर्गामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

२.२ महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसख्येंपैकी असतील.

२.३ वि.जा(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) मधील आंतरपरिवर्तन आरक्षण शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी-१०९७/प्र.क्र.६३/९७/१६-ब, दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ प्रमाणे राहील.

२.४ खेळाडूंचे आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील. खेळाडूंसाठी आरक्षित पदाकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी त्यांची पात्र खेळाडू असल्याबाबतची प्रमाणपत्रे मुलाखतीस आमंत्रित केल्यानंतर प्रस्तुत पदांच्या मुलाखतीपूर्वी क्रीडा संचालनालयाकडून प्रमाणित करुन घ्यावीत.

२.५ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सा.प्र.वि., क्र.एसआरव्ही१०१२/प्र.क्र.१६/१२/१६ अ, दि.१३ ऑगस्ट, २०१४ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.६ विकलांगासाठी असलेली पदे संबंधित संवर्गाच्या भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

२.७ विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

२.८ विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापासून सात (७) दिवसाच्या आत यासंदर्भात संबंधीत उमेदवारांने आयोगास स्वतंत्रपणे पत्राद्वारे विनंती करणे आवश्यक आहे.

२.९ कक्ष अधिकारी गट-ब हे पद वगळता इतर पदांकरिता "महाराष्ट्र शासकीय गट अ व गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबतची नियमावली २०१०" लागू आहे."

**३. वेतनश्रेणी** :-

३.१ गट -अ च्या पदांकरिता रूपये १५,६००-३९,१००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

३.२ गट-ब च्या पदांकरिता रूपये ९,३००-३४,८००, नियमानुसार ग्रेड पे अधिक भत्ते.

**४. पात्रता** :-

४.१. भारतीय नागरिकत्व

४.२ **वयोमर्यादा** :-

४.२.१ दिनांक **१ एप्रिल, २०१५** रोजी वय किमान १९ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

४.२.२ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम :-

(१) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(२) विकलांग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षांपर्यंत.

(३) पात्र खेळाडूंच्या बाबतीत ५ वर्षांपर्यंत.

(४) माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांचेसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत.

(५) विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**४.३ शैक्षणिक अर्हता** :-

४.३.१ उपलब्ध पदसंख्येतील सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ, तसेच सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब ही दोन पदे वगळून इतर पदांसाठी मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने मान्य केलेली समतुल्य अर्हता.

४.३.२ सहायक संचालक, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ पदासाठी खालीलप्रमाणे अर्हता आवश्यक :-

(१) सांविधिक विद्यापीठाची, किमान ५५ टक्क्यांसह वाणिज्य शाखेची स्नातक पदवी, किंवा

(२) इन्स्टिटयुट ऑफ चार्टर्ड अकांऊटस ऑफ इंडिया यांनी घेतलेली सनदी लेखापालाची अंतिम परिक्षा उत्तीर्ण, किंवा

(३) इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अँड वर्क्स अकांऊटस यांनी आयोजित केलेली परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण, किंवा

(४) सांविधिक विद्यापीठाची वाणिज्य मधील पदव्युत्तर पदवी, किंवा

(५) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यताप्राप्त संस्थेमधून वित्त व्यवसाय प्रशासन या विशेषज्ञतेसह पदव्युत्तर पदवी (एम.बी.ए.)

४.३.३ सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब पदाकरिता अभियांत्रिकी किंवा भौतिक शास्त्र व गणित विषयासह विज्ञान शाखेतील पदवी.

४.३.४ पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार सुध्दा या पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु राज्य सेवा (पूर्व) परीक्षा- २०१५ मधून अर्हताप्राप्त ठरणा-या उमेदवारांनी राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २०१५ चे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

४.३.५ अंतर्वासिता किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवीधारकाने ही अट मुख्य परीक्षेचे अर्ज स्वीकारण्याच्या विहित अंतिम दिनांकापर्यन्त पूर्ण केली असली पाहिजे.

४.३.६. सर्व पदांसाठी मराठीचे ज्ञान आवश्यक राहील.

**५. शुल्क** :

**५.१** :- अमागास - **रु. ५१५**/- ५.२ :- मागासवर्गीय - **रु. ३१५**/-

**५.३** आयोगाने निश्चित केलेले परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) नेटबँकिंग (३) डेबिट कार्ड. (४) क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

**५.४** www.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससीची सूची उपलबध आहे.

**६. अर्ज करण्याची पद्धत :-**

६.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

६.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based)ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ ते दिनांक २० जानेवारी, २०१५** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

६.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६.४ विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

६.५ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक करावे.

(२) '**माझे खाते**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने '**माझे अप्लिकेशन**' सदरातील '**स्पर्धात्मक परीक्षा**'या लिंक वर क्लिक करावे.

(३) '**स्पर्धात्मक परीक्षा**' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर ' Unpaid' असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी ' Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

(४) ' Pay Now ' या लिंक वर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाद्वारे

(५) क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(६) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

(७) चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

(८) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**६.६ केंद्र निवड :-**

६.६.१ परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर - उमेदवाराला परीक्षा केंद्राची निवड करणे आवश्यक आहे. त्याकरिता माझे खाते मधील संबंधित परीक्षेची निवड करावी. त्यानंतर केंद्र निवडा या पर्यायावर क्लिक करावे. सदर पर्यायांतर्गत निवडलेल्या केंद्राची क्षमता दर्शविली जाईल. केंद्राच्या क्षमतेइतक्या उमेदवारांचे अर्ज तत्पूर्वी प्राप्त झाले असतील, तर सदर केंद्र उपलब्ध नसून, दुसरे केंद्र निवडावे, असा संदेश प्राप्त होईल. केंद्राची निवड केल्यानंतर सेव्ह बटनावर क्लिक केल्यास केंद्र निवडीची व अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण होईल.

६.६.२ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडलेले उमेदवार शुल्क भरल्याच्या दिनांकाच्या दुस-या दिवशी केंद्र निवडीची प्रक्रिया करु शकतील. दुसरा दिवस कार्यालयीन सुट्टी अथवा रविवारचा असेल तर उमेदवार सदर कार्यवाही त्यानंतर लगेच येणा-या पुढील कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी करु शकतील.

६.७ प्रस्तुत परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

७. परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेशपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

८. प्रस्तुत जाहिरातीमध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशिल दिलेला आहे. पूर्व परीक्षेच्या प्रवेशासाठी माहिती स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया,परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील स्पर्धा परीक्षेअंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" तसेच "परीक्षा" विभागातील उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे.

९. सदर जाहिरात आयोगाच्या www.mpsc.gov.in व https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

१०. विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक २० जानेवारी, २०१५ रोजी २३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

११. चलनाद्वारे **परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास** भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक २१ जानेवारी, २०१५** पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा **शुल्काचा** परतावाही केला जाणार नाही.

१२. राज्य सेवा (पूर्व) परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या **www.mpsc.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३१ डिसेंबर, २०१४.

श्री.शं. पाठक
उप सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

**(१) आयोगाच्या कार्यालयात,परीक्षा कक्षात,परीक्षा केंद्राच्या परिसरात,तसेच,शारीरिक चाचणी व मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन, अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे. (२) मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर परीक्षेची उमेदवारी नाकारली जाईल.**